तरुण भारत संवाद
शनिवार, ३१ जानेवारी २०२६

# आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत ऋषिकेश उपविजेता

- गोव्याचा मंदार लाड विजेता
- हुबळीत प्रजासत्ताकदिनानिमित्त जलदगती स्वरुपात स्पर्धेचे आयोजन
- महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, पश्चिम बंगालच्या बुद्धिबळपटूंना ऋषिकेशने दिली टक्कर

प्रतिनिधी
कोल्हापूर

गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्रासह देशातील बुद्धिबळ खेळात आपल्या बुद्धिचातुर्याच्या जोरावर नाव कमवत असलेल्या कोल्हापूरच्या ऋषिकेब कबनूरकरने आंतरराष्ट्रीय फिडे प्रजासत्ताक चषक रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत उपविजेतेपद मिळवले. या उपविजेतेपदाला गवसणी घालताना त्याने स्पर्धेत ९ पैकी ८ गुणांची विश्वसनीय कमाई केली. हूबळी (कर्नाटक) येथील केलई टेक्निकल



ऋषिकेश कबनूरकर

कॉलेजात ही स्पर्धा झाली.

दरम्यान, ऑल इंडिया चेस असोसिएशनच्या मान्यतांनी धारवाड चेस असोसिएशन व कर्नाटक चेस असोसिएशन यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये देशातील लहानांपासून ते ५५ वर्षापर्यंतच्या अगदी तयारीच्या ३१६ बुद्धिबळपटूंनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा स्वीस लीग पद्धतीने आणि जलदगतीच्या आंतरराष्ट्रीय नियमांनुसार नऊ फेऱ्यांमध्ये झाली. या स्पर्धेत कोल्हापूरतर्फे ऋषिकेश कबनूरकर हा सहभागी झाला. त्याने स्पर्धेतील सामन्यांमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, तामिळनाडू, पश्चिम बंगाल येथील बुद्धिबळपटूंनी बौद्धिक झुंज देत पराभूत करताना ९ पैकी ८ गुण मिळवले. याच गुणांमुळे ऋषिकेशच्या गळ्यात स्पर्धेच्या उपविजेतेपदाची माळ पडली.

गोव्याच्या मंदार लाडनेही स्पर्धेत सर्वोत्कृष्ट खेळी करत ९ पैकी ८.५ गुण प्राप्त करुन स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. बक्षीस वितरण समारंभात स्पर्धा विजेत्या मंदारला ४० हजार रुपये आणि चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच उपविजेत्या ऋषिकेशलाही ३० हजार रुपये व चषक असे बक्षीस देऊन गौरवले. तसेच नियमानुसार ऋषिकेशला फिडे १८ गुणही देण्यात आले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी हूबळी जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे धारवाड चेस असोसिएशन व कर्नाटक चेस असोसिएशनला सहकार्य लाभले. ऋषिकेश कबनुरकर हा अनुज ॲकॅडमीचा बुद्धिबळपटू आहे. तो सध्या स्वामी विवेकानंद महाविद्यालयात शिकत असून त्याला संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव व कोल्हापूर जिल्हा बुद्धिबळ असोसिएशन माजी सेक्रेटरी कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

पुढारी
शनिवार, ३१ जानेवारी २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये हुतात्म्यांना आदरांजली

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी दोन मिनिटे मौन पाळून विवेकानंद कॉलेजमध्ये आदरांजली वाहण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, ज्युनिअर व सिनिअर कॉलेजचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

पुढारी , शनिवार, ३१ जानेवारी २०२६

# विवेकानंद महाविद्यालयामध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालय मराठी विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा झाला. पंधरवड्यामध्ये व्याख्याने, निबंध, वक्तृत्व, शुद्धलेखन व अभिवाचन स्पर्धा तसेच शासकीय मुद्रणालय भेट असे उपक्रम राबविण्यात आले. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते झाले. 'बोलीचा जागर' या विषयावर मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी मार्गदर्शन केले. 'मराठी भाषा आणि रोजगाराच्या संधी' या विषयावर डॉ. प्रदीप पाटील यांनी विचार मांडले. शासकीय मुद्रणालयातील भेटीवेळी तेथील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मुद्रणालयाच्या कामकाजाची व त्यातील रोजगाराच्या संधी याविषयी माहिती दिली. पंधरवड्याचे संयोजन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. डॉ. प्रदीप पाटील, प्रा. रोहिणी रेळेकर यांनी केले.

1/. 26

-2026

# विवेकानंद कॉलेजमध्ये 'हुतात्मा दिन' निमित्त भावपूर्ण आदरांजली




**कोल्हापूर प्रतिनिधी: पांडुरंग फिरींगे**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिलेल्या हुतात्म्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यासाठी दरवर्षी 30 जानेवारी रोजी संपूर्ण देशभर हुतात्मा दिन साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून विवेकानंद कॉलेजमध्ये हुतात्मा दिनानिमित्त भावपूर्ण आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.शुक्रवार, दि. 30 जानेवारी 2026 रोजी सकाळी ठीक 11.00 वाजता कॉलेजच्या ग्रंथालयासमोरील प्रांगणात उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी परिसरात अत्यंत शिस्तबद्ध व भावनिक वातावरण निर्माण झाले होते.या कार्यक्रमास मा. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, ज्युनिअर व सिनिअर कॉलेजमधील विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येत हुतात्म्यांच्या त्यागाचे स्मरण करून देशप्रेम, एकता व कर्तव्यनिष्ठेची भावना अधिक दृढ करण्याचा संकल्प केला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची जाणीव जागृत होऊन राष्ट्रसेवेसाठी प्रेरणा मिळाल्याचे चित्र दिसून आले.

# विवेकानंद कॉलेजमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात संपन्न




**कोल्हापूर प्रतिनिधी: पांडुरंग फिरींगे**

येथील विवेकानंद कॉलेजमध्ये मराठी विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 14 जानेवारी ते 28 जानेवारी 2026 या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात संपन्न झाला.या पंधरवड्याच्या कालावधीत व्याख्याने, निबंध, वक्तृत्व, शुद्धलेखन, अभिवाचन स्पर्धा तसेच शासकीय मुद्रणालय भेट असे विविध भरगच्च व अभ्यासपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. या सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते झाले. "बोलीचा जागर" या विषयावर मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी सखोल मार्गदर्शन केले. तर "मराठी भाषा आणि रोजगाराच्या संधी" या विषयावर डॉ. प्रदीप पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.शासकीय मुद्रणालयाच्या भेटीदरम्यान तेथील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मुद्रणालयाच्या कार्यपद्धतीसह त्यातून उपलब्ध होणाऱ्या विविध रोजगार संधींची सविस्तर माहिती दिली. या पंधरवड्यात आयोजित करण्यात आलेल्या निबंध, वक्तृत्व, शुद्धलेखन व अभिवाचन स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.पंधरवड्याच्या समारोप प्रसंगी मा. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले.या संपूर्ण उपक्रमाचे यशस्वी संयोजन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. डॉ. प्रदीप पाटील व प्रा. रोहिणी रेळेकर यांनी केले.मराठी भाषेच्या संवर्धनासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भाषाभिमान, सर्जनशीलता व रोजगाराभिमुख दृष्टीकोन अधिक दृढ झाल्याचे दिसून आले.